नि. दि. दावा क्र. ४६/२००८

नि. ३०४

**प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र. २ यांची साक्ष**

**शपथेवर सरतपासणी वादीपक्षातर्फे – श्री. एस.व्ही. लाळे विद्यमान वकील यांच्यामार्फत**

शपथेवर सत्य कथन करतो की, माझे संपूर्ण नाव प्रदिप विष्णु जाधव, वय–५४ वर्षे, धंदा–मेडीकल व्यवसाय, राहणार – आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली असुन माझ्या सरतपासाच्या शपथपत्रातील संपूर्ण मजकुर मी सांगितल्याप्रमाणे खरा व बरोबर असुन त्याचे सत्यतेकामी मी त्यावर माझी सही आहे.

**०१.** आता मला वर्णन यादी ६८/२ वरील दि. १९/०२/१९९६ च्या खरेदीपत्राची मुळ प्रत दाखविण्यात आली. त्यावर माझी साक्षीदार म्हणून सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. सदर खरेदीपत्रास **निशाणी ३०६** देण्यात येते.

**वादीतर्फे उलटतपास विद्यमान वकील श्री. आर.ए. उथळे यांच्यामार्फत सुरु –**

**०२.** हे म्हणणे खरे आहे की, मी सद्या ज्याठिकाणी मेडीकलचा व्यवसाय करतो ती जागा खरेदी घेतलेली आहे. सदर जागा माझ्या वडीलांनी पस्तीस ते चाळीस वर्षांपूर्वी खरेदी घेतली असावी. मी त्या जागेमध्ये माझे मेडीकलचे दुकान मागील दोन वर्षांपासून सुरु केले आहे.

**०३.** हे म्हणणे खरे आहे की माझे मुळ गांव बेनापूर, ता. खानापूर असून त्याठिकाणी आमची वडीलोपार्जीत शेती व घरमिळकत आहे. माझे वडीलांचे अंदाजे सात ते आठ वर्षापूर्वी निधन झाले आहे. हे म्हणणे खरे आहे की, बेनापूर

येथील शेजमिन आणि घर मिळकत यांची वहिवाट मी आटपाडीहून जावून येवून करतो.

**०४.** मी बाबूराव संजू तरसे या व्यक्तीला ओळखत नाही. हे म्हणणे खरे आहे की, अब्दुल हसन संदे यांच्याबरोबर माझे स्वतःचे व्यवहार झालेले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे माझा आणि अब्दुल संदे यांचा परिचय असण्याचा संबध कधी आला नाही. हे म्हणणे खरे आहे की, चिंचाळे आणि खरसुंडी येथे माझी स्वतःची शेतजमिन आणि घरमिळकत नाही. मोहन जगदाळे माझ्या ओळखीचे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मोहन जगदाळे माझे पाहूणे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, विलास भगवान शिंदे आणि मोहन जगदाळे यांचे काय संबंध आहेत हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, विलास भगवान शिंदे आणि मोहन जगदाळे यांच्याशी माझे काही व्यवहार झाले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, विलास भगवान शिंदे माझ्या परिचयाचे नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मोहन जगदाळे माझ्या परिचयाचे नाहीत.

**०५.** हे म्हणणे खरे नाही की, दि. १९/०२/१९९६ रोजी मला विलास शिंदे यांच्याकडून फोन आला. हे म्हणणे खरे नाही की, तसाच फोन मला दि. १९/०२/१९९६ रोजी मोहन जगदाळे यांच्याकडूनआला. हे म्हणणे खरे आहे की, दि. १९/०२/१९९६ रोजी अब्दूल सदे यांच्याकडून फोन आला नव्हता. माझ्या वडीलांचे खरेदीपत्र कोणत्या दस्त लेखणीकाने लिहला होता हे मला माहिती नाही. बॉन्ड रायटर शंकर गणेश दाणी, रा. आटपाडी हे माझ्या ओळखीचे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझे कोणतेही वैयक्तीक दस्त किंवाव्यवहार शंकर

गणेश दाणी यांनी लिहलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, दि. १९/०२/१९९६ रोजी मला शंकर दाणी यांचा फोन आला होता. हे म्हणणे खरे आहे की, दि. १९/०२/१९९६ रोजीच्या दस्ताबाबत मला कोणताही फोन आला नव्हता.

**०६.** मला मोहन जगदाळे यांचा मुलगा माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि. १९/०२/१९९६ रोजीच्या दस्तावर माझी सही आहे, असे मला लाळे वकीलांनी सांगितले आहे. साक्षीदार सांगतात की, वकीलांमार्फत सांगण्यात आले आहे. हे म्हणणे खरे नाही की, नि. ३०६ मधील मजकूराबाबत मला प्रत्यक्ष माहिती नाही. हे मला आठवत नाही की, नि. ३०६ वर सही करण्यासाठी मी आटपाडी येथील निबंधक कार्यालयात दुपारी ३.०० च्या सुमारास गेलो होतो किंवा कसे. हे मला आठवत आहे की, ज्यावेळी मी नि. ३०६ वर सही केली त्यावेळी तो दस्त लिहून पूर्ण झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, नि. ३०६ वरील सही मी कोठे केली हे मला आठवत नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतात की निबंधक कार्यालयात केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी ३०६ बाबतच्या दस्ताबाबत आणि व्यवहाराबाबत मला काहीही माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, वकीलांच्या सांगण्यावरुन मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास काही नाही**.

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/–

दिनांक –२२.०१.२०२५.

**(आर. बी. कुलकर्णी)**

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, आटपाडी.